# शासन परवानगी प्राप्त माध्यमिक शाळांना प्रथम मान्यता देणे

प्रस्तावासोबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

1 मा.शा.सं. नियम 3.1 प्रमाणे परिशिष्ट क 2 मधीलक विहित नमुन्यातील अर्ज सादर केला आहे.

2 शाळेचा वार्षिक तपासणी अहवाल जोडला आहे / नाही .

3 संस्थेच्या घटनेची प्रत जोडली आहे / नाही.

4 संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी जोडली आहे / नाही.

5 शाळेतील कर्मचारी यादी जोडली आहे / नाही.

6 शाळेतील विदयार्थ्यांची यादी वर्ग निहाय जोडली आहे /नाही.

7 संस्थेचे बॅक बॅलेंस प्रमाणपत्र जोडले आहे / नाही.

8 शाळेच्या इमारतीचा वर्गवार खोल्या दर्शविणारा कच्चा नकाशा जोडला आहे /नाही.

9 इमारत भाडयाची असल्यास इमारत मालकाशी झालेले करारपत्र जोडले आहे /नाही.

10 स्थानिक ठिकाणाच्या प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची वर्गवार पटसंख्या दर्शविणारी माहिती सोबत जोडली आहे /नाही.

11 संस्था नोंदणी प्रमाणपत्रे सोबत जोडली आहे /नाही.

12 मुला / मुलींसाठी स्वतंत्रपणे स्वच्छता गृहाची सोय असल्याबाबत शाळेचे पत्र जोडले आहे / नाही.

13 सदर परवानगी / मान्यता बाबत शि.अ. यांनी स्पष्ट शिफारस केली आहे / नाही.

जनहितार्थ या क **483/04** मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि . **14** एप्रिल **2009** रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी. तसेच पूर्तता अहवाल प्रस्तावासोबत सादर केल्याशिवाय प्रथम मान्यता प्रस्ताव मंजूर केले जाणार नाहित याची कृपया नोंद घ्यावी.

1 शाळांमध्ये सहा महिन्यांच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी .

2 शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत .

3 शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे .

4 शदर शाळेची इमरत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (**National Building Code of India**) अतंर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमरत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसेल प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील .

5 प्रत्येक शाळेच्या इमारतची सुरक्षिरततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (**National Building Code of India**) चे काटेकोरपणे पालन करावे.

6 वरील काम जे अधिकारी / कर्मचारी नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ-1. शासन पत्र कमांक – याचिका- **2009**/प्र.क.**244**/प्राशि-4/

दि.**19** सप्टेंबर,**2009.**

**2.**संचालनालयाचे पत्र क.संकीर्ण—**2009/64116**/याचिका/15क (8)

**9344**, दि.**24** सप्टेंबर, **2009.**